सोलापूर
प्रखर राष्ट्रीय विचारांचे दैनिक
तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
संभाजीनगर, सातारा, सोलापूर, अहमदनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून प्रकाशित
epaper.dainiktarunbharat.com
24 Aug 2024 - Page 13

# लोटस पोदार लर्न स्कूल येथे सायबर शिक्षा फॉर सुरक्षा कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२३ ऑगस्ट -**

शिवछत्रपती बहुउद्देशीय शिक्षण प्रसारक मंडळ संचलित लोटस पोदार लर्न स्कूल येथे क्लिक हील फाऊंडेशन कंपनी, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने लातूर जिल्हा स्तरावर सचिव म्हणून नियुक्त प्रतिक्षा रमेश पांगे यांची सायबर शिक्षा फॉर सुरक्षा या विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली.

सर्वप्रथम प्रशालेचे प्राचार्य श्रीकांत वारुडे, उपप्राचार्य अतुल फावडे व समन्वय विभावरी थिटे यांनी प्रतिक्षा पांगे यांचे प्रशालेच्या वतीने स्वागत केले तदनंतर या कार्यशाळेची सुरुवात झाली. आपल्या व्याख्यानातून प्रतिक्षा पांगे यांनी सायबर गुन्हे, सोशल मीडिया, मोबाईल प्लिकेशन यातून सायबर क्राईम, होणारी अर्थिक फसवणूक या समस्या कशा निर्माण होतात. याचे ज्वलंत उदाहरणावरून विद्यार्थ्यांना म ार्गदर्शन केले. त्याचबरोबर यातून आपण, आपले कुटुंब व समाज कसे सुरक्षित राहू शकते याची माहिती उपस्थितांना आपल्या म ार्गदर्शनातून दिली.

ही कार्यशाळा प्रशालेत इयत्ता पाचवी ते दहावी विद्यार्थ्यांसाठी आयोजित केली गेली होती. याम ुळे विद्यार्थ्यांना मोबाईल फोन, सोशल नेटवर्किंग, वेब साईट वापर यातील समस्या व उपाययोजना याबद्दल यथोचित माहिती मिळाली व त्याबद्दल विद्यार्थ्यांमध्ये उत्साह व समाधान दिसून आले.

या कार्यशाळेसाठी सुत्रसंचलन दुर्गानाथ देशमुख यांनी केले तर आभार सहशिक्षक धिरज जाधव यांनी मानले.

ही कार्यशाळा प्रशालेचे प्राचार्य श्रीकांत वारुडे, उपप्राचार्य अतुल फावडे, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या उपस्थितीत संपन्न झाली.